**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४५ वा | बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# प्रशासनाकडून निवडणुकीची जय्यत तयारी



## ईव्हीएम वितरण, स्ट्रॉंग रूम, मतमोजणी ठिकाणे निश्चित

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी प्रशासनाने तयारीला वेग दिला असून १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यावश्यक असलेले ईव्हीएम मशीन, मतदान साहित्याचे वितरण व स्वीकृती, मतदानानंतर ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रूम तसेच मतमोजणीची ठिकाणे अधिकृत करण्यात आली आहेत. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील विविध शासकीय व शैक्षणिक इमारतींमधील खोल्या व खुल्या जागांना यासाठी मान्यता दिली आहे. या ठिकाणांचा वापर मतदान साहित्य वितरण, मतदानानंतर ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवणे (स्ट्रॉंग रूम) तसेच मतमोजणीसाठी केला जाणार आहे. निवडणूक प्रशासनाने प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त केले असून त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांनी निवडणूक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन निवडणूक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १**

भैरप्पा राजू माळी यांच्याकडे प्रभाग क्रमांक १, २, ३ व ४ ची जबाबदारी देण्यात आली आहे. या प्रभागांची मतमोजणी वेलणकर हॉल, दयानंद कॉलेज, सोलापूर येथे होणार असून ईव्हीएम स्ट्रॉंग रूम वेलणकर हॉल येथील रूम नं. १ (पहिला मजला) आणि दयानंद कॉलेजमधील रूम नं. २ मध्ये असेल.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २**

विजया पांगरकर यांच्याकडे प्रभाग क्रमांक ५, ६, ७ व १५ देण्यात आले आहेत. मतमोजणी सेंट्रल लायब्ररी बिल्डिंग, सिंहगड कॉलेज, केगाव येथे होणार असून ईव्हीएम स्ट्रॉंग रूम मॅनेजमेंट बिल्डिंग, तळमजला, सिंहगड कॉलेज येथे राहील.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३**

सचिन इथापे यांच्याकडे प्रभाग क्रमांक ८. ९ व १४ ची जबाबदारी असून मतमोजणी शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे होईल, ईव्हीएम स्ट्रॉंग रूम रूम नं. ४ व ५. शासकीय तंत्रनिकेतन येथे असेल.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ४**

अंजली मरोड यांच्याकडे प्रभाग क्रमांक १०, ११, १२ व १३ देण्यात आले आहेत. मतमोजणी कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय इमारत, सोलापूर येथे होणार असून ईव्हीएम स्ट्रॉंग रूम मातोश्री आशाताई अंबादास सरगम शाळा, रूम नं. ३. नर्सरी स्ट्रॉबेरी, कुचन प्रशाला येथे राहील.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ५**

अभिषेक देशमुख यांच्याकडे प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २१ असून मतमोजणी विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, जुळे, सोलापूर येथे होणार आहे. ईव्हीएम स्ट्रॉंग रूम याच प्रशालेच्या तळमजल्यावर असेल.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ६**

सदाशिव पडदुणे यांच्याकडे प्रभाग क्रमांक १९, २० व २५ देण्यात आले आहेत. मतमोजणी नूतन मराठी विद्यालय, सोलापूर येथे होणार असून ईव्हीएम स्ट्रॉंग रूम नर्सरी फुलपाखरू कलादालन, नूतन मराठी विद्यालय येथे असेल.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ७**

जयश्री आव्हाड यांच्याकडे प्रभाग क्रमांक २२, २३, २४ व २६ ची जबाबदारी आहे, या प्रभागांची मतमोजणी शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड सोलापूर येथे होणार असून ईव्हीएम स्ट्रॉंग रूम देखील याच ठिकाणी असणार आहे.

## श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्ग व होम मैदानाची आयुक्तांकडून पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात भाविकांच्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरी होणाऱ्या श्री सिद्धरामेश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर आज सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यात्रेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या होम मैदान तसेच नंदी ध्वज मिरवणूक मार्गाची सखोल पाहणी केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, राजशेखर हिरेहब्बू, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी,मनोज जाधव, सागर करोसेकर उपस्थिती होते.या पाहणीदरम्यान यात्रेदरम्यान भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये तसेच मिरवणूक सुरळीत व सुरक्षित पार पडावी, यासाठी आयुक्तांनी संबंधित विभागांना विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. मिरवणूक मार्गावरील झाडांच्या अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्या तात्काळ कट करून काढाव्यात, जेणेकरून उंच नंदी ध्वज, मिरवणूकला अडचण येऊ नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.तसेच मिरवणूक मार्गावरील लटकणाऱ्या केबल वायर, टेलिफोन व विद्युत तारा सुरक्षित पद्धतीने दुरुस्त अथवा हलविण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले. यात्रेदरम्यान रात्रीच्या वेळी प्रकाशयोजना योग्य राहावी यासाठी एलईडी लाईट्स व अतिरिक्त प्रकाश व्यवस्था उभारण्याबाबत तसेच खराब किंवा बंद असलेल्या लाईट्स तात्काळ दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले.

मिरवणूक मार्गावरील खड्डे, रस्त्यांची दुरवस्था व आवश्यक ठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, जेणेकरून भाविक, वाहनचालक व मिरवणूक सहभागी यांना कोणताही धोका निर्माण होणार नाही, असेही आयुक्तांनी सांगितले.

होम मैदान परिसरात यात्रेसाठी होणाऱ्या धार्मिक विधी व कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पिण्याचे पाणी, तात्पुरती शौचालये, विद्युत पुरवठा, आरोग्य सुविधा व अग्निशमन यंत्रणेची सज्जता याबाबतही आयुक्तांनी पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले.यात्रेच्या काळात स्वच्छता विभाग, पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, उद्यान विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन दल, वाहतूक पोलिस व पोलीस प्रशासन यांनी परस्पर समन्वयाने काम करून यात्रेचे नियोजन यशस्वी करावे, असे निर्देश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका श्री सिद्धरामेश्वर यात्रेसाठी सर्वतोपरी तयारी करत असून, भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## सोलापूर-पुणे महामार्गावर शेटफळ शिवारात भीषण अपघात; अपघातामुळे वाहतूक ठप्प



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** सोमवार ता 5 जानेवारी रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर शेटफळ जवळ मुंबई वरून सोलापूर कडे जाणाऱ्या भरधाव कार क्रमांक MH 46 BU 5408 ने मोडनिंब वरून सिद्धेवाडी कडे जात असलेल्या एका दुचाकी क्रमांक MH 13 V 6039 ला पाठीमागून जोरदार धडक देऊन झालेल्या अपघातात दुचाकी चालक डोक्याला जबर मार लागून गंभीर जखमी झाला, तर कारमधील अन्य 5 जण किरकोळ जखमी झाले.

अपघातात गंभीर जखमी झालेल्या मोटार सायकल स्वाराला वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिके मधून डॉ. गोरखनाथ लोंढे यांनी मोहोळ येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना उपचारापुर्वी मृत घोषित केले. कार मधील किरकोळ जखमी झालेल्या 5 जणांना शेटफळ येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.त्यांच्यावर डॉ सरवदे यांनी उपचार करून त्यांना कळंबोली येथे पाठविले.

अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल नाका येथील गस्तीपथक व मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होऊन अपघातातील कार आणि दुचाकी वरवडे टोल नाका येथील गस्तीपथकाने वरवडे टोल नाका येथील क्रेनच्या मदतीने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

युवराज बजरंग शिंदे वय 55 वर्षे. रा. सिद्धेवादी ता मोहोळ जि सोलापूर असे मृताचे नाव आहे. तर मच्छिंद्र नागनाथ नागरगोजे रा कळंबोली, सविता वामन खाडे रा कळंबोली, दक्ष बाळू मगर रा पनवेल, निर्मला बाळू भगत रा पनवेल, देवांश बाळू भगत रा पनवेल अशी जखमींची नावे असून, मच्छिंद्र नागनाथ नागरगोजे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अधिक उपचारासाठी पंढरपूर येथील रुग्णालयात दाखल केले आहे. या अपघाताची नोंद मोहोळ पोलीसात झाली असुन तपास हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

## प्रभाग ४ च्या मतदारांकडून 'यावेळी बदल घडवू' चा सूर; राष्ट्रवादी ला चांगला प्रतिसाद





**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मध्ये शिवसेनाझ राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांनी वैयक्तिक संपर्क व प्रत्यक्ष दौऱ्यांद्वारे प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. घराघरांत जाऊन, गल्ली-बोळातून फिरत मतदारांशी थेट संवाद साधला जात असून, या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

प्रचारादरम्यान अनेक ठिकाणी मतदार स्वतःहून पुढे येत, 'यावेळी नक्कीच बदल घडवू' अशी भावना व्यक्त करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

विकास, पारदर्शक कारभार व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणाऱ्या उमेदवारांमुळे प्रभागात बदलाचा स्पष्ट संकेत मिळू लागल्याचा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

प्रभाग क्रमांक ४ मधून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार सी. ए. सुशिल बंदपट्टे यांनी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, स्थानिक समस्या, नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. 'कामाचा माणूस, आपला माणूस' या भूमिकेतून लोकप्रतिनिधित्व करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


या प्रचार दौऱ्यावेळी प्रभाग क्रमांक ४ मधील शिवसेनाझ राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे अधिकृत उमेदवार अ) कविता चंदनशिवे, ब) सी. ए. सुशिल बंदपट्टे, क) सारिकताई फुटाणे व ड) विश्वनाथ बिडवे उपस्थित होते. सर्व उमेदवारांनी एकत्रितपणे मतदारांशी संवाद साधत युतीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

प्रभागात सुरू असलेल्या या वैयक्तिक संपर्क मोहिमेमुळे युतीच्या प्रचाराला बळ मिळाले असून, आगामी निवडणुकीत प्रभाग क्रमांक ४ मध्ये बदल निश्चित असल्याची भावना समर्थकांमध्ये व्यक्त होत आहे.

## अखेर जेम्स लेनच्या वादग्रस्त पुस्तकाबाबत ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची जाहीर माफी

### दोन दशकांनंतर ऐतिहासिक वादावर पडदा

### महाराष्ट्रात उसळलेली वैचारिक घुसळण पुन्हा चर्चेत


PUBLIC NOTICE

Oxford University Press India

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** सुमारे दोन दशकांपूर्वी महाराष्ट्रात प्रचंड वाद निर्माण करणाऱ्या जेम्स लेन यांच्या 'शिवाजी - हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या पुस्तकाबाबत अखेर संबंधित प्रकाशक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस (OUP) यांनी आज जाहीर माफी मागितली आहे. या माफीमुळे एकेकाळी संपूर्ण महाराष्ट्रात उसळलेल्या वैचारिक व सामाजिक आंदोलनाची आठवण पुन्हा एकदा ताजी झाली आहे. जेम्स लेन यांनी पुण्यातील तथाकथित 'कुजबूज गॅंग' च्या माहितीवर आधारित हे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि विशेषतः राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या चारित्र्यावर आक्षेपार्ह व अवमानकारक उल्लेख केल्याचा आरोप करण्यात आला होता. या मजकुरामुळे महाराष्ट्रात तीव्र संतापाची लाट उसळली होती.

या पुस्तकाच्या विरोधात राज्यभर आंदोलन झाले. इतिहासाचा अपलाप, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा अपमान आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला धक्का देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत विविध संघटना, विचारवंत, अभ्यासक आणि सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर उतरले होते. या प्रकरणामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, इतिहासलेखनाची जबाबदारी आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यावर व्यापक चर्चा झाली होती.

या वादग्रस्त पुस्तकाचे प्रकाशक असलेल्या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने आता अधिकृतरीत्या जाहीर माफी मागून संबंधित पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत खेद व्यक्त केला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या एका संवेदनशील वादावर काहीअंशी पडदा पडल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या माफीबाबत विविध प्रतिक्रिया उमटत असून, अनेकांनी याला उशिरा का होईना, पण ऐतिहासिक सत्य आणि महाराष्ट्राच्या भावनांचा सन्मान केल्याची पावती मानली आहे. तर काही अभ्यासकांनी इतिहास लेखन करताना संदर्भांची शहानिशा व सामाजिक भान ठेवण्याची गरज पुन्हा अधोरेखित केली आहे.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या या माफीमुळे भविष्यात इतिहासाशी संबंधित लिखाण करताना अधिक जबाबदारीने व संवेदनशीलतेने काम करण्याचा संदेश जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रचार सभांसाठी १३ मैदानांसह ५८ चौक निश्चित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रचारासाठी महापालिकेच्या वतीने "एक खिडकी कक्ष" कार्यान्वित करण्यात आला आहे. निवडणूक प्रचारासाठी जाहीर सभा घेण्यासाठी शहरातील एकूण १३ मैदाने, क्रीडांगणे व खुल्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच कॉर्नर सभा (कोपरा सभा) घेण्यासाठी शहरातील विविध भागांतील ५८ चौक व ठिकाणे निश्चित करण्यात आली, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रचारासाठी आवश्यक परवानग्या सुलभ, पारदर्शक व वेळेत मिळाव्यात, यासाठी महापालिकेच्या वतीने "एक खिडकी कक्ष" प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून उमेदवार व राजकीय पक्षांना प्रचारासंबंधी सर्व परवानग्या एका ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.याशिवाय, खाजगी जागांवर बॅनर व फलक लावण्यासाठीची परवानगी, तात्पुरते प्रचार कार्यालय उभारण्याची परवानगी तसेच प्रचारासाठी वाहन परवानगीदेखील एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारांना विविध विभागांमध्ये स्वतंत्रपणे फेऱ्या मारण्याची गरज भासत नसून, परवानगी प्रक्रियेत वेग व सुलभता आली आहे. या एक खिडकी कक्षामध्ये सोलापूर महानगरपालिका, पोलीस विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग संयुक्तपणे कार्यरत आहेत.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी एक खिडकी व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आचारसंहिता, पारदर्शकता आणि उमेदवार व नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, याबाबत आवश्यक सूचना दिल्या. या पाहणीप्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त मनीषा मगर, पी. पी. जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेत सुयोग्य नियोजन, कायद्याचे पालन आणि सर्वांना समान संधी मिळावी यासाठी कटिबद्ध असून, 'एक खिडकी कक्ष'मुळे प्रचार परवानग्या अधिक सोप्या व पारदर्शक पद्धतीने दिल्या जात असल्याचे आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## एक खिडकी कक्षात प्रचार परवानग्यांसाठी मोठी गर्दी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रचारासाठी महापालिका प्रशासकीय इमारत येथे "एक खिडकी कक्ष" कार्यान्वित करण्यात आला आहे. आज या ठिकाणी प्रचाराच्या रिक्षांची मोठी रांग लागली होती.

इतर परवान्यांसाठीही मोठी गर्दी झाली होती. परवानगी देण्यात विलंब होत असल्याने कर्मचारी वाढविण्याची मागणी होत आहे..

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रचारासाठी आवश्यक परवानग्या सुलभ, पारदर्शक व वेळेत मिळाव्यात, यासाठी महापालिकेच्या वतीने "एक खिडकी कक्ष" प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून उमेदवार व राजकीय पक्षांना प्रचारासंबंधी सर्व परवानग्या एका ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.याशिवाय, खाजगी जागांवर बॅनर व फलक लावण्यासाठीची परवानगी, तात्पुरते प्रचार कार्यालय उभारण्याची परवानगी तसेच प्रचारासाठी वाहन परवानगीदेखील एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. या एक खिडकी कक्षामध्ये सोलापूर महानगरपालिका, पोलीस विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग संयुक्तपणे कार्यरत आहेत.

दरम्यान, या कक्षामध्ये आज विविध परवानगीसाठी संबंधितांची मोठी गर्दी दिसून आली. खिडक्या कमी आहेत. त्या संख्येत वाढ करावी. परवानगीसाठी अर्ज घेण्यात येतो मात्र पोच पावती देण्यात येत नाही. प्रचार रिक्षा परवानगीसाठी विविध कागदपत्रे मागणी केलेली आहे. तो परवाना देण्यासाठी फार वेळ लागत आहे. रिक्षा लांब थांबवून येत असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. या ठिकाणी टोकन सिस्टीम सुरू करावी. पाण्याची व बसण्याची सोय करावी अशी मागणी होत आहे. प्रचारासाठी दिवस कमी आहेत. तात्काळ याकडे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी लक्ष घालून आवश्यक त्या सूचना द्याव्यात अशीही मागणी होत आहे.

## संपादकीय

# जाहीर माफी : इतिहासाच्या अपमानावर उशिरा आलेली कबुली सांस्कृतिक स्वाभिमानाच्या लढ्याचा अखेरचा टप्पा?

सुमारे दोन दशकांपूर्वी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक आणि सामाजिक विश्वाला हादरवून सोडणाऱ्या जेम्स लेन यांच्या 'शिवाजी – हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या वादग्रस्त पुस्तकाबाबत अखेर ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने जाहीर माफी मागितली. ही माफी म्हणजे केवळ एका प्रकाशकाने व्यक्त केलेला खेद नसून, महाराष्ट्राच्या इतिहास, अस्मिता आणि भावनांवर झालेल्या अन्यायाची उशिरा का होईना दिलेली कबुली आहे. या पुस्तकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत आणि विशेषतः राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या चारित्र्यावर केलेले आक्षेपार्ह उल्लेख केवळ वैचारिक मतभेद नव्हते, तर ते थेट ऐतिहासिक अपप्रचाराचे उदाहरण होते. पुण्यातील तथाकथित 'कुजबूज गँग'च्या अप्रमाणित, एकांगी माहितीवर आधारित लेखनाला आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेने व्यासपीठ देणे, ही त्या काळातील बौद्धिक बेफिकिरीच होती. या पुस्तकाच्या निषेधार्थ महाराष्ट्र पेटून उठला. रस्त्यावर उतरलेले कार्यकर्ते, अभ्यासक, इतिहासप्रेमी आणि सामान्य नागरिक हे केवळ एका पुस्तकाविरोधात नव्हते, तर ते इतिहासाच्या अपमानाविरोधात उभे ठाकले होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सांस्कृतिक दहशतवाद चालवला जाऊ शकत नाही, हा ठाम संदेश त्या आंदोलनातून गेला. ५ जानेवारी हा दिवस 'सांस्कृतिक दहशतवाद मुक्ती दिन' म्हणून ओळखला जाणारा दिवस या माफीला अधिक प्रतीकात्मक महत्त्व प्राप्त होते. भांडारकर प्रकरणानंतर संभाजी ब्रिगेडने इतिहासाच्या पुनर्लेखनाची जी मुहूर्तमेढ रोवली होती, त्या संघर्षाला आज १९ वर्षे पूर्ण होत आहेत. 'लढेंगे, जितेंगे' हा नारा केवळ घोषवाक्य राहिला नाही, तर तो काळाच्या कसोटीवर खरा उतरल्याचे या माफीने अधोरेखित केले आहे. या लढ्यात सोलापूरसह राज्यातील अनेक भागांतील तरुणांचा सहभाग होता. हा सहभाग केवळ आंदोलनापुरता मर्यादित नव्हता, तर तो वैचारिक जागृतीचा भाग होता. इतिहास कोणाच्या मर्जीने, कोणाच्या अजेंड्याने लिहिला जाऊ नये, तर तो पुराव्यांवर, सत्यावर आणि सांस्कृतिक संवेदनशीलतेवर आधारित असावा, हीच त्या लढ्याची मूळ भूमिका होती. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची ही माफी स्वागतार्ह असली, तरी ती खूप उशिरा आलेली आहे. तरीही, उशिरा का होईना, सत्य मान्य करण्याचे धाडस ही बाब महत्त्वाची आहे. ही घटना भविष्यात इतिहासलेखन करताना अभ्यासक, लेखक आणि प्रकाशकांनी अधिक जबाबदारीने वागावे, याची जाणीव करून देणारी ठरेल, अशी अपेक्षा आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा दस्तऐवज नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडवणारा असतो. त्यामुळे इतिहासाशी खेळ करणाऱ्यांना वेळ लागला, तरी उत्तर द्यावेच लागते. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची माफी हेच सिद्ध करते. मुजरा त्या सर्वांना, ज्यांनी सत्यासाठी संघर्ष केला.
जय शिवराय. जय जिजाऊ.

## पशुसंवर्धन विभागाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कडील सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात यासाठी पात्र लाभार्थीनी २४ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही. डी. येवले यांनी केले आहे.

**जिल्हा परिषद उपकर योजना**

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५% अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे. पशुपालकांना मिल्कीग मशिन ५०% अनुदानावर पुरविणे. वरील योजनांसाठी पात्र लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात येत असून सदरचे अर्ज दिनांक ५ जानेवारी २०२६ पासून पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती तसेच सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत.

तसेच जिल्हा परिषदेच्या (६६६.९psolapur) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख दिनांक २४ जानेवारी २०२६ आहे.

तरी इच्छुक पात्र लाभार्थीनी वरील योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर कूलदीप जंगम, मा. उपाध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संदीप कोहिणकर व जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही.डी. येवले यांनी केले आहे.

# लाईक, शेअर आणि कमेंट

आजचे युग हे 'लाईक, शेअर आणि कमेंट' चे आहे. फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम अशा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आजची तरुण, प्रौढ आणि थोडीफार वयस्क मंडळी दिवसातील किमान एक तास तरी घालवत आहेत. आवडलेल्या पोस्टला, व्हिडिओला किंवा रिलला लाईक करणे, शेअर करणे अथवा कमेंट करणे हे नित्याचे झाले आहे. अभिव्यक्तीचा हा बदलता फॉर्म आता सर्वांच्या अंगवळणी पडू लागला आहे.


मनापासून आवडलेली पोस्ट असेल तर लाईक करणे सहज होते; मात्र न आवडलेल्या गोष्टीलाही लाईक करून पोस्ट टाकणाऱ्याची मर्जी राखावी लागते. पूर्वी पारावर बसून लोक समोरासमोर गप्पा मारायचे. मनातील विचार मोकळेपणाने मांडायचे, एखादी कथा किंवा कल्पना सर्वांना सांगायचे, घडलेला प्रसंग कथन करायचे. आपले मत मनापासून व्यक्त करून समोरच्या सगळ्यांवर प्रभाव टाकायचे. बोलण्यातून आणि हावभावांतून त्या व्यक्तीचा खरेपणा समजायचा. आज मात्र सगळे काही नाटकी झाले आहे. तीस सेकंदांची स्वतःची रील बनवून अनेक जण लोकांना सहज वेड्यात काढतात. तंत्रज्ञानाचा वापर करून, रिटेक घेऊन तयार केलेला व्हिडिओ पाहणाऱ्याचे मन सहज बदलवू शकतो.

प्रत्यक्ष भेटींपासून खलिता, घोडेस्वार, कबूतर, पत्र, फोन, मोबाईल, व्हाट्सअप , फेसबुक, इंस्टाग्राम अशी साधने वापरत माणूस वेगाने बदलत चालला आहे.आता लोक एकमेकांशी ऑनलाईन भांडतात. फेसबुक व इंस्टाग्रामवर एकमेकांच्या कुळाचा उद्धार करतात. अंगावरची कपडे काढून, डोक्याला गुंडाळून लोक एकमेकांवर जहरी कमेंट्स करतात. व्हाट्सअप वर झालेली भांडणे प्रत्यक्ष मैदानात उतरतात आणि दंगली भडकतात. एखाद्या पोस्टवर टाकलेल्या कमेंटवर पुन्हा कमेंट्स येतात आणि त्यातून एकमेकांना ' पाहून घेऊ' अशी भाषा वापरली जाते.जात, धर्म, वंश, भाषा, राजकीय विचारसरणी या सगळ्या विषयांवर लोक तावातावाने, अतार्किक पद्धतीने व्यक्त होतात. एखाद्याचे मनोबल खच्ची करण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्याच्या सोशल मीडियाच्या वॉलवर नको त्या शब्दांत कमेंट करणे—हे आजचे प्रभावी अस्त्र बनले आहे. मॉर्फ करून तयार केलेले व्हिडिओ समाजात अशांतता निर्माण करू शकतात. एआयचा वापर करून बनवलेले व्हिडिओ एखाद्याला आयुष्यातूनच उठवू शकतात.

लाईक, कमेंट आणि शेअर यांच्या माध्यमातून समाजात आनंद, प्रेम, शांतता आणि भाईचारा पसरवायचा की अशांतता—हे आता समाजाच्या हातात आहे.

१९९० च्या दशकात जन्माला आलेल्या अनेकांच्या डोळ्यांसमोर जन्मानंतर लगेचच कॉम्प्युटरचा स्क्रीन आणि इंटरनेट आले. ही पिढी आज २५ ते ३० वर्षांची असून करिअर आणि सोशल मीडियात गुंतलेली आहे. त्यांच्या पाठोपाठ आलेली १५ ते २५ वयोगटातील तरुण पिढी ज्या अनुभवांतून जगते, त्यांचा गंधही ४५ ते ७० वयोगटातील जुन्या पिढीला नाही. त्यामुळे या 'जेन झी' पिढीला समजून घेणे आणि त्यांच्या अभिव्यक्तीच्या नव्या ट्रेंडला योग्य दिशा देणे, हेच वयस्कर पिढीसमोरील खरे आव्हान आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, तंत्रज्ञान थांबणार नाही; बदलही थांबणार नाही. मात्र 'लाईक, शेअर आणि कमेंट' या छोट्याशा कृतींमागे असलेली जबाबदारी प्रत्येकाने ओळखली, तर हाच सोशल मीडिया समाजजोडीचा मजबूत पूल ठरू शकतो.



– किशोर जाधव, सोलापूर
– मो. नं. ९९२२८८२५४१

## नवीन महाप्रसादालयाचा कॉक्रीट टाकण्याचा शुभारंभ

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत मंडळाकडून स्वामी भक्तांकरिता सतत विविध विधायक कार्याच्या माध्यमातून सेवा समर्पित कायार्ने पुढे जात आहे., श्री क्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात भर पडणाऱ्या न्यासाच्या आवारात नवीन महाप्रसादालय उभारत असून, याचे तळमजला सल्याब एम–३५ श्रेणीचे कॉक्रीट टाकण्याचा शुभारंभ मंगळवारी अंगारकी चतुर्थीच्या मुहूर्तावर न्यासाचे पदाधिकारी, विश्वस्त, क्रियाशील सदस्य, सेवेकरी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



दरम्यान न्यासाचे उपाध्यक्ष– अभय खोबरे, सचिव– शामराव मोरे, खजिनदार– लाला राठोड, क्रियाशील सदस्य– संदीप फुगे–पाटील, साई सुश्रृत डेव्हलपर्स एल.एल.पी. पुणे व्यवस्थापकीय संचालक– निहार अडकर, मनोज निकम, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी शिवराज स्वामी, मैनुद्दीन कोरबू, साई सुश्रृत डेव्हलपर्स एल.एल.पी. पुणे चे मुख्य अभियंता– रामदास तांबे, मुख्य अधिकारी– प्रशांत काळे, प्रकल्प व्यवस्थापक– राजेंद्र पाटील, कनिष्ठ अभियंता– ऋषिकेश शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक– रमाकांत कोष्टी, अमर बोंद्रे, बाबू चौगुले, सुभाष निकम, निखील पाटील, संजय गोंडाळ, प्रवीण घाटगे, वैभव मोरे, सनी सोनटक्के, सुमित घाडगे, बसवराज क्यार, महादेव अनगले, स्वामिनाथ मलवे, बिरप्पा व्हनझेंडे, गणेश भोसले, ज्ञानेश्वर भोसले, धानप्पा उमदी, मारुती बोरकर, समर्थ घाटगे, समर्थ चव्हाण, नामा भोसले, कुमार सलबत्ते, विशाल कलबुर्गी यांच्या सह क्रियाशील सदस्य, सेवेकरी, कर्मचारी उपस्थित होते.

या मंगलमय प्रसंगी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठण, विधीवत पूजन संपन्न झाले.

सदर होणारी नवीन महाप्रसाद गृहाची इमारत भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून, या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य– भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार असून, या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. गेल्या नोव्हेंबर–२०२४ पासून सदरचे काम प्रगतीपथावर आहे, येत्या २ वर्षात हे महाप्रसादगृह भक्तांच्या सेवेत असणार आहे.

## प्रबोधन

# एकाग्रता साधा । जगी व्हा महान

'मन ओढाळ ओढाळ। उभ्या पिकातलं ढोर। किती हाकला हाकला। फिरी येतं पिकावर ॥' बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेच्या ह्या ओळी मनाच्या चंचलपणाचं, ओढाळपणाचं वर्णन करतात. पण हे कोणाचं मन चंचल असतं? शिक्षित माणसाचं की अशिक्षित माणसाचं? श्रोत्यांचं की वक्त्यांचं? शिक्षक– प्राध्यापकांचं की वर्गातील विद्यार्थ्यांचं? आपल्या अशिलाची बाजू मांडणाऱ्या वकिलाचं, की कोर्टात बसलेल्या बघ्याचं? संशोधनमग्न शास्त्रज्ञाचं की प्रयोगशाळेच्या पहारेकऱ्याचं ? थोडा विचार केल्यावर कळतं की बहिणाबाईंनी ओढाळ, चंचल, स्वैर म्हणून ज्या मनाचा उल्लेख केला ते संस्कारहीन, शिस्तहीन, उद्दिष्टहीन, सरावहीन, महत्त्वाकांक्षाहीन, दिशाहीन, स्वत्वहीन, अभिरुचीहीन, कला–कौशल्यहीन मोकाट, उच्छृंखल, आणि आदिमस्वरूपी आहे. सुदैवाने आदिमस्वरूपी मन जगात फारसं आढळत नाही हे खरंच आहे. म्हणूनच 'मन' कवितेच्या साच्यात आपण सर्वांना बसवू शकत नाही, हे बरंच आहे.

शेक्सपियर हा सुप्रसिद्ध नाटककार होता, विचारवंत नव्हे! म्हणूनच त्याने हॅम्लेटच्या तोंडी चंचलते तुझे नाव स्त्री असं वाक्य घातलं. पण त्या कुप्रसिद्ध वाक्यातील विधानात बेजबाबदारपणाच अधिक आहे. कारण जगातल्या सर्व स्त्रिया चंचल असत्या, तर कुटुंबसंस्थांचं अस्तित्वच नष्ट झालं असतं. नव्या पिढ्यांनी जगभर उत्पात घडवले असते, उच्छाद मांडला असता, पण तसं झालेलं नाही. पुरुषांहून स्त्रिया जास्त संयमी, सोशिक, मर्यादशील आणि स्थिरबुद्धीच्या असतात, हे सिद्ध झालेलं आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असं चिंतनशील माणसं उगीच का म्हणतात? म्हणून शेक्सपियरचं विधान विवेकीपणाच्या कसोटीवर टिकत नाही.

स्त्रियांच्या मनाला हा एकाग्रपणाचा संस्कार लाभतो कुठून? तो निसर्गानेच त्यांना बहाल केलेला असतो. त्यांच्या शारीरिक नाजुकपणापासून त्यांचं रक्षण व्हावं म्हणूनच निसर्गाने त्यांना एक सावध, शंकाकुल पण एकाग्र मन वरदानस्वरूप दिलं आहे. गमतीची गोष्ट अशी की, बहिणाबाईंनी 'मन' या विषयावर आपलं मन एकाग्र केलं नसतं किंवा त्या म्हणतात तसं त्यांचं मन ओढाळ असतं, तर ही समाजप्रिय–मार्गदर्शक कविता जन्माला तरी आली असती? तात्पर्य, स्त्रिया तुलनेने अधिक लवकर मनाची एकाग्रता साधू शकतात; परीक्षांच्या गुणवत्ता यादीत म्हणूनच त्यांना अव्वल स्थान मिळत असतं.

शिक्षण आणि मनाची एकाग्रता या विषयाचं चिंतन आमच्या शिक्षणतज्ज्ञांनी फारसं केलेलं नाही, हे खेदाने नमूद केलं पाहिजे. आज प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर असलेली तासिका पद्धती, शालेय आणि सहशालेय उपक्रमांची सरमिसळ ही विद्यार्थ्यांच्यात मुळात असलेला एकाग्रतेचा संस्कार नष्ट करीत असल्याचं दिसतं.

वास्तविक सहशालेय उपक्रमांची उचलबांगडी झाल्याशिवाय म्हणजेच सहली, स्नेहसंमेलनं, नाटकं, क्रीडास्पर्धा, हस्तलिखितं हे सर्व अभ्यासेतर उपक्रम शालेय वातावरणातून हद्दपार केल्याशिवाय ज्ञानार्जनात विद्यार्थ्यांना आवड निर्माण होणार नाही; आणि ते ज्ञानोपासनेत एकाग्रही होऊ शकणार नाहीत. पाश्चात्य शिक्षणपद्धती वर्गाध्यापनाची नसते; तर विषयाध्यापनाची असते. आपल्या आवडीच्या विषयाच्या कक्षात विद्यार्थ्याने प्रवेश केला, की तिथे त्याला पाठ्यांश, तासिका अशी कोणतीही बंधनं नसतात. त्यामुळे त्याची ज्ञानार्जनातील एकाग्रता वाढते. ज्ञानाची समरसता साधते, त्यात तो स्वतःला झोकून देतो. पुढे अशा व्यक्तींना नोबेल पुरस्कार प्राप्त होतात. एकाग्रपणाची ही साधना आपण कधी करणार? गौतम बुद्ध म्हणाले, 'जो चित्ताची एकाग्रता साध्य करू शकत नाही तो बुद्धीच्या मंदिरात प्रवेशच करू शकत नाही.' विषयाध्यापनकक्ष निर्माण करणं फारसं अवघड नाही. पण तोपर्यंत तासिकांची लांबी (कालावधी) आपण वाढवू शकतो. एका शालेय दिवशी अभ्यास एकाग्रपणे होऊ शकतो. आज ३५ ते ४५ मिनिटं इतकाच वेळ अगदी महाविद्यालयीन अभ्यासासाठीसुद्धा दिला जातो, त्यामुळे प्रत्यक्ष ज्ञानार्जनाला फारच थोडा वेळ मिळतो. शिक्षकांचं जाणं–येणं, कालच्या अध्ययनाचा विचार, आजच्या पाठ्यांशाचा प्रारंभ या साऱ्या सव्यापसव्यात वेळेची जी गळती होते, ती तर अक्षम्यच असते. शिवाय त्यामुळे एकाग्रतेची साधना संकटात पडते. 'एकाग्रता हे सामर्थ्याचे रहस्य आहे' असं विचारवंत इमर्सन म्हणतात, अर्थात, एकाग्रतावृद्धीचा विचार मध्ये ठेवून त्याभोवती अध्ययन–अध्यापन प्रक्रियेची पुनर्रचना केल्याशिवाय भारतीय शिक्षणातील उपलब्धी (Output) वाढणार नाही. 'अभ्यास, मनन, चिंतन, पाठांतर यासाठी चित्ताची एकाग्रता हवीच,' असं एक शिक्षणतज्ज्ञ म्हणतात. आपण यापैकी फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो. पण मनन, चिंतन, पाठांतर यांची व्यवस्था आपण कधी करणार? तात्पर्य, एकाग्रता हे साध्य आहे, ते साध्य करा. कारण–

एकरूप झाला । आपुल्या कामात
ज्ञानसाधनेत । तोच थोर ॥ १
एकाग्र होण्याची । युक्ती सोपी आहे
कामाकडे पाहे । आवडीने ॥२
कलावंत – कवी। मूर्ती–चित्रकार
साधती अपार । तद्रूपता ॥ ३
अत्युच्च पातळी। एकरूपतेची
गाठी, तो कीर्तीची। सीमा लंघे ॥४
शिक्षणाने साधी । जो एकरूपतेला
त्याचिया यशाला । अंत नाही ॥५
श्रेष्ठ तोची जगी । एकाग्र जो होई
थोरपणा राही । त्याच्या पाशी ॥६
सरावाने सारे। काही साध्य होते
असाध्य नसते । एकाग्रता ॥७
एकाग्रता साधा। जगी व्हा महान
होऊ दे जीवन । मुक्त, धन्य ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

## श्री भगवती गौरीमाता प्रशालेच्या विज्ञान साहित्याची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशालेतील बसवराज रविकांत तोळणुरे या विद्यार्थ्यांची सौर कृषी पंप या विज्ञान साहित्याची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

स्वेरी इंजिनिअरींग कॉलेज पंढरपूर येथे सोलापूर जिल्हा विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात प्रशालेतील बसवराज तोळणुरे या विद्यार्थ्यांनी सौर कृषी पंप हे विज्ञान साहित्य मांडले होते.

परिक्षक तथा विज्ञान व टेक्निकल तज्ञांनी त्याच्या सौर कृषी पंप साहित्याची निरिक्षण करुन जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक गटात प्रथम क्रमांक देऊन राज्य विज्ञान प्रदर्शनासाठी निवड केली आहे. या विद्यार्थ्याला प्रयोगशाळा परिचर महेश हांडगे, सहशिक्षक नागेशप्पा लंगोटे , सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक सुरेश घागरे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल काशी पीठाचे जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, श्री बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री बालपस्वी चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, सचिव शांतय्या स्वामी,मुख्याध्यापक गिरमल बुगडे, पर्यवेक्षक सचिन देगांवकर, विज्ञान विभाग प्रमुख अरुण हत्ताळी, विज्ञान विषय शिक्षिका वर्षा बिराजदार,ज्योती कलबुर्गी व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी अभिनंदन केले. धोत्री पंचक्रोशीत शाळेचे कौतुक होत आहे.

**सौर कृषी पंप साहित्याचा उपयोग**

हे सौर कृषी पंप शेतकऱ्यांना उपयुक्त आहे. पेट्रोल अथवा डिझेल न वापरता , निसर्ग निर्मित सौर उर्जेवर चालणारे प्रदुषण विरहीत किडनाशक, किटकनाशक, तणनाशक फवारणीसाठी वापर केला जातो.यासाठी शेतकरी आपल्या डोक्यावर असलेल्या हेल्मेट अथवा टोपीवर सौर प्लेट बसवून हात पंप चालवून फवारणी करु शकतो. हि नवनिर्मिती विज्ञान साहित्य पेटंटसाठी कंपनी पुढे येतील व शेतकऱ्यांना नक्कीच उपयोगी पडेल अशी अपेक्षा सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक श्री सुरेश घागरे सर यांनी व्यक्त केले.

# दिनेश घोडके यांच्या भाजपाला पाठिंब्यामुळे चार प्रभागांमध्ये वाढले बळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जय मातादी प्रतिष्ठानच्या माध्यमातून युवकांचे मोठे संघटन उभे करणारे दिनेश घोडके यांनी आमदार देवेंद्र कोठे यांच्या यशस्वी शिष्टाईमुळे निवडणुकीतून माघार घेत भाजपाच्या उमेदवारांचा प्रचार सुरू केल्याने भारतीय जनता पार्टीच्या चार प्रभागातील उमेदवारांना मोठे बळ मिळाले आहे. प्रभाग क्रमांक १३ सह प्रभाग क्रमांक ९, १२ आणि १८ अशा चारही प्रभागांमध्ये भाजपाने प्रचारात आघाडी घेतली आहे.



दिनेश घोडके यांनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून जय मातादी प्रतिष्ठान तर्फे विविध सामाजिक धार्मिक उपक्रम राबवून कार्यकर्त्यांचे मोठे जाळे विणले आहे. दिनेश घोडके यांना प्रभाग क्रमांक १३ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अधिकृत उमेदवारी देण्यात आली होती. यानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी जय मातादी प्रतिष्ठानचे प्रमुख दिनेश घोडके यांना विश्वासात घेऊन आगामी काळात सकारात्मक विचार करण्याची हमी दिली. आणि उमेदवारी माघारी घेण्याची विनंती केली. आमदार देवेंद्र कोठे यांनी दिलेला शब्द प्रमाण मानून दिनेश घोडके यांनी या निवडणुकीतून माघार घेत भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग क्रमांक १३ मधील सर्व उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला तसेच त्यांच्या समवेत प्रचारात सक्रिय झाले आहेत.

प्रभाग क्रमांक १३ सह परिसरातील प्रभाग क्रमांक ९, १२ आणि १८ अशा चारही प्रभागांमध्ये दिनेश घोडके यांचा कार्यकर्ता वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांना दिनेश घोडके यांनी भाजपच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी कामाला लागण्याचे आदेश दिल्यामुळे जय मातादी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते तसेच दिनेश घोडके मित्रपरिवार भाजप उमेदवारांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. श्री. घोडके यांच्या या भूमिकेमुळे भाजपने निवडणुकीच्या स्पर्धेत विरोधकांना मागे खेचत एक पाऊल पुढे टाकले आहे.

आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक प्रभागात बारकाईने लक्ष घालत भारतीय जनता पार्टीचे सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी शथीर्चे प्रयत्न सुरू केले आहेत. या निवडणुकीच्या माध्यमातून आमदार देवेंद्र कोठे यांनी शहर मध्य विधानसभा मतदारसंघ शतप्रतिशत भाजपमय करण्याचा चंग बांधलेला आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या या प्रयत्नांना यश येताना दिसत असून उमेदवारी न मिळाल्यामुळे प्रारंभी काहीसे नाराज झालेले भाजपाचे कार्यकर्ते आता मात्र प्रचारात जोरदार सक्रिय झालेले दिसून येत आहेत.

## बेताल बोल

### समाजसेवक

पुढे सरकले राजकारण
आणि जन्मली नवी वृती...
काही होवो,मीच जिंकावे
आणि माझीच सत्ता,ही प्रवृत्ती...
लोकशाही शाही होतेय
की होतेय भक्कम भारी...
घराघरात आहेत सेवक
आणि सत्तेचे कारभारी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# थोबडे वस्ती आणि साठे पाटील वस्तीमध्ये गणेश वानकर यांच्याकडून नंदनवन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राजकारणात नेता कोणत्या पक्षात आहे,याचा जनतेवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. नगरसेवक असताना केलेली कामे जनता आजही विसरलेली नाही. याचा प्रत्यय प्रभाग क्रमांक ६ मध्ये भाजपचे उमेदवार गणेश वानकर यांना प्रचाराच्या दरम्यान येत आहे. प्रभाग क्रमांक ६ चे भाजपचे उमेदवार गणेश वानकर,सोनाली गायकवाड, मृण्मयी गवळी आणि सुनील खटके यांचा मंगळवारी होम टू होम प्रचाराचा दुसरा दिवस होता. या दरम्यान सकाळच्या सत्रात उमेदवारांनी साठे पाटील वस्ती तसेच थोबडे वस्ती भागातील नागरिकांशी संवाद साधताना गणेश वानकर यांनी नगरसेवक असताना मागील पाच वर्षात या भागात केलेली कामे आणि परिसराचे केलेले नंदनवन यांच्या आठवणी ताज्या झाल्या. घरोघरी उमेदवारांचे स्वागत करताना, दादा आपण दिलेल्या रस्ते,वीज व पाणी या मूलभूत सुविधांमुळे परिसरातील अडचणी कायमस्वरूपी निकाली लागल्याचे नागरिकांनी सांगून दादांच्या विजयात मोठा हातभार लावला. पिण्याचे पाणी हा महिलावर्गाचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो.

हाच पाण्याचा विषय गणेश वानकर यांनी कायमस्वरुपी सोडविल्यामुळे महिलावर्गांनी अक्षरशः भाजपचे उमेदवार गणेश वानकर यांच्या आरत्या करून कृतज्ञता व्यक्त केली.घरोघरी उमेदवाराचे दमदार स्वागत करण्यात आले. महापालिकेत भाजपाची सत्ता आणि नगरसेवक शिवसेनेचा असताना विकासाचा धडाका लावला आहे.

आणि आता तर सत्ताधारी भाजपसोबत गणेशदादा गेल्यामुळे प्रभागाच्या विकासाचे चित्रच बदलू जाणार असल्याच्या भावना नागरिकांची व्यक्त करत या भागातून भाजपाला सर्वाधिक मताधिक्य देणार असल्याची ग्वाही नागरिकांनी दिली.

थोबडे वस्ती,साठे पाटील वस्तीसह संपूर्ण परिसर भाजप उमेदवारांनी पिंजून काढला. यावेळी अरुण जाधव,आशिष डिगोळे,महेश मुदलियार ,नागेश मस्के, सोमाथ मस्के, प्रमोद आवताडे, नवनाथ मस्के, समर्थ डोंगरे, रितेश मस्के, चेतन घुले, योगेश मस्के, महादेव काळे, सागर डोंगरे यांच्यासह परिसरातील नागरिक आणि भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महिलांच्या समस्यांना प्राधान्य

प्रभाग क्रमांक सहा मध्ये आपण भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जनसेवेसाठी सामोरे जात आहोत. प्रभागातील महिलांच्या समस्या सोडविण्याला आपले प्रथम प्राधान्य असणार आहे. विशेषतः शौचालयाचा मोठा प्रश्न असून सोलापूर महानगरपालिकेत याच महिलांच्या महत्त्वाच्या प्रश्नावर आपण आवाज उठविणार असल्याचे भाजपचे उमेदवार मृण्मयी गवळी यांनी महिलांशी संवाद साधताना सांगितले. नगरसेवक असताना गणेश दादा वानकर यांनी केलेले विकास कामे सुद्धा भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना सर्वाधिक मताने विजय करण्यात मोठा हातभार लावणार असल्याचेही मृण्मयी गवळी यांनी सांगितले.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन हद्दवाढ भागातील नेहरुनगर येथील जुना सर्व्हे नं.३५१/१ यांसी नवीन सर्व्हे नं.७/१ पैकी कित्तुरचन्नम्मा नगर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट क्र. १७५ याचे एकुण क्षेत्रफळ १००० चौ.फुट अथवा ९२.९३ चौ.मी. इतकी आहे. यात लोडबेअरींग स्वरुपाचे बांधकाम क्षेत्र २५.०० चौ.मी. व राहिलेली खुली जागा असलेली सामाईक जिन्यासह घरजागा मिळकत, यांसी चतु:सिमा :- पुर्वेस प्लॉट क्र.१६५, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं.१७४ व उत्तरेस- प्लॉट क्र. १७६. येणेप्रमाणे चतु: सिमेतील नमुद केलेली घरजागा मिळकत व आतील विटा, सिमेंट, दगड, घरजागा मिळकत ही श्री. राजेंद्र आप्पासाहेब पाटील यांचे खरेदी मालकी वहिवाटीची असून, त्यांनी सदरहु घरजागा मिळकत आमचे अशिलास खुषखरेदीने देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरहु घरजागा मिळकत ही निवेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

तरी सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कसलाही हक्क, दावा, गहाण, बोजा, बक्षीस, वहिवाट वगैरे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे खालील पत्त्यावर पृष्ठयर्थ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी अगर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणी कांही हक्काची जाणीव करुन न दिल्यास सदर घरजागा मिळकत वर नमुद मालकांची असून, ती निर्वेध व निजोखमी आहे व सदर मिळकतीत अन्य कोणाचा कसलाही हक्क व हितसंबंध नाही, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाची कांहीही तक्रार चालणार नाही.ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली

ता. ०७/०१/२०२६

**ॲड. श्री. रविकांत एल. तळ्ळीकर**
**बी.कॉम.,एलएल.बी.,जी.डी.सी.ॲन्ड ए.**
**ऑफिस- जी-२३०,रेणुका नगरी, रेणुका मंगल कार्यालयजवळ,**
**बॉम्बे पार्क जवळ, जुळे सोलापूर,सोलापूर**
**मो. नं. ९७६३२०४०४०**
**अशिल श्री. खंडू सुरेश सलगरकर तर्फे ॲडव्होकेट**

# बॅलेट मतपत्रिकेचे रंग वेगवेगळे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी मतदान होणार असून यंदाची मतदान प्रक्रिया थोडी वेगळी राहणार आहे. यंदा बॅलेट युनिटवर उमेदवारांचे नाव आणि चिन्हांच्या पुढे वेगवेगळे रंग असलेल्या मतपत्रिका असणार आहेत. प्रभाग एक ते 24 साठी चार वेगवेगळे मतपत्रिका तर 25 आणि 26 साठी तीन वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असणार आहेत. प्रभाग एक ते 24 साठी चार मतदान तर 25 आणि 26 साठी मतदारांना तीन मतदान करावे लागणार आहे. पूर्ण मतदानाची प्रक्रिया झाल्याशिवाय बीपिंगचा आवाज येणार नाही, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी दिली. यंदा प्रत्येक जागेसाठी मतपत्रिकांचे रंग वेगवेगळे ठेवण्यात आले आहेत. 'अ' जागेसाठी पांढरा, 'ब' जागेसाठी फिका गुलाबी, 'क' जागेसाठी फिका पिवळा तर 'ड' जागेसाठी, फिका निळा रंग असणार आहे. त्यामुळे मतदारांनी मतदान करताना रंगांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक 1 ते 24 मधील मतदारांना चार मते द्यावी लागणार आहेत. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या जागेसाठी बटन दाबल्यानंतर उमेदवाराच्या नावासमोरील लाल दिवा लागेल, मात्र बीप आवाज येणार नाही. चौथ्या व शेवटच्या जागेसाठी मतदान केल्यानंतर दीर्घ बीप आवाज येईल. याच बीप आवाजानंतर मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्याचे समजावे.

प्रभाग क्रमांक 25 व 26 साठी तीन मते द्यायची असून पहिल्या दोन जागांसाठी बीप आवाज येणार नाही, तर तिसऱ्या व अंतिम मतानंतर दीर्घ बीप ऐकू येईल. तसेच कोणताही उमेदवार पसंत नसल्यास प्रत्येक जागेसाठी 'नोटा' हा पर्याय उपलब्ध आहे. मतदानाची वेळ सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत राहणार आहे. यंदा 'एक मत' नव्हे तर प्रभागानुसार तीन किंवा चार मते द्यायची असल्याने प्रत्येक मतदाराने जागरूक राहून योग्य पद्धतीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**मतपत्रिकांचे रंग असे :**

अ जागा : पांढरा
ब जागा : फिका गुलाबी
क जागा : फिका पिवळा
ड जागा : फिका निळा

**प्रभाग क्रमांक 1 ते 24 :**

एकूण 4 मते द्यायची
पहिली, दुसरी, तिसरी जागा : लाल लाईट, बीप नाही
चौथी (शेवटची) जागा : दीर्घ बीप आवाज

**प्रभाग क्रमांक 25 व 26 :**

एकूण 3 मते द्यायची
पहिली व दुसरी जागा : लाल लाईट, बीप नाही
तिसरी (शेवटची) जागा : दीर्घ बीप आवाज

**दीर्घ बीप आवाज म्हणजे मतदान प्रक्रिया पूर्ण**

# पत्रकारांनी नैतिकता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक- सुनील सोनटक्के



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात दरवर्षी ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. जिल्हा माहिती कार्यालय येथे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के व मान्यवर ज्येष्ठ पत्रकार यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब वाघमोडे, भगवान परळीकर, राजेंद्र पवार, चंद्रशेखर गायकवाड, योगेश तुरेराव, बिराजदार, विश्वनाथ व्हनकोरे, संतोष शेलार, अनिल शिराळकर तसेच कार्यालयातील कर्मचारी शरद नलवडे, संजय घोडके, दिलीप कोकाटे, भाऊसाहेब चोरमले, प्रविण चव्हाण, श्रीमती. पुजा वैद्य, पंकज बर्दापूरकर उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांचे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी स्वागत करून त्यांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पत्रकार दिनाच्या औचित्याने बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या दर्पण या वृत्तपत्राद्वारे समाजजागृती, शिक्षणप्रसार आणि राष्ट्रीय चेतना निर्माण करण्याच्या योगदानाची माहिती देण्यात आली.

जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के यांनी आपल्या भाषणात पत्रकार दिनाचे महत्त्व अधोरेखित केले.

त्यांनी सांगितले की, पत्रकारितेतील सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि लोकहिताचा विचार हीच खरी पत्रकार दिनाची शिकवण आहे.

आधुनिक काळात डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया यांचा प्रभाव वाढला असला तरी पत्रकारांनी नैतिकता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित वरिष्ठ पत्रकारांनी त्यांना पत्रकारिता करत असताना आलेल्या अनुभवाची माहिती सर्वांसमोर सादर केली. यामध्ये बाळासाहेब वाघमोडे, परळीकर यांनी आपले विचार व्यक्त केले तसेच पत्रकार योगेश तुरेराव यांनीही त्यांचे अनुभव कथन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकारितेच्या गौरवशाली परंपरेला अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी पत्रकार दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस असल्याचे मत व्यक्त केले. जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर येथे पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बाळशास्त्री जांभेकर यांच्या योगदानाची आठवण करून पत्रकारितेतील नैतिकता व जबाबदाऱ्या अधोरेखित करण्यात आल्या.

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

मुबीन अ.रशीद शेख वय-४३ वर्षे. धंदा- नोकरी रा. मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची बहिण निलोफर रशीद शेख जन्म दि. २९/५/१९८४ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची बहिण निलोफर रशीद शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता. २९/५/१९८४ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९८४ चे आभिलेखात अर्जदार यांची बहिण यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

दौलतबी मकबूल मुलाणी दौलती रसूल मुलाणी (लग्नानंतरचे नाव) वय -६५ वर्षे.धंदा- मजुरी रा.सय्यद वरवडे जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत पोखरापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार दौलतबी मकबूल मुलाणी यांच्या जन्म दि. १/१/१९५९ रोजी सय्यद वरवडे ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचा म्हणजेच दौलतबी मकबूल मुलाणी यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.१/१/१९५९ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी १९५९ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता. ५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

बंडू बाबू सय्यद वय-४६ वर्षे.धंदा-मजुरी सोहाळे जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत सोहाळे } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार बंडू बाबू सय्यद यांच्या जन्म दि.३/६/१९८० रोजी सोहाळे ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचा म्हणजेच बंडू बाबू सय्यद यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.३/६/१९८० रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९८० चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

परमेश्वर रामचंद्र गायकवाड वय-५५ वर्षे. धंदा- मजुरी रा. मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची परमेश्वर रामचंद्र गायकवाड जन्म दि.५/१२/१९७० रोजी मोहोळ ता. मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची परमेश्वर रामचंद्र गायकवाड यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.५/१२/१९७० रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे डिसेंबर १९७० चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

सय्यद रसूल मुजावर वय-३४ वर्षे.धंदा-मजुरी रा.सय्यद वरवडे जि. सोलापूर } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामपंचायत पोखरापूर } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार रेशमा रसूल मुजावर यांच्या जन्म दि. ३०/१२/१९८६ रोजी सय्यद वरवडे ता.मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची बहिण म्हणजेच रेशमा रसूल मुजावर यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.३०/१२/१९८६ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे डिसेंबर १९८६ चे आभिलेखात अर्जदार यांची यांची बहिण जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

सुलताना महेबूब मनियार वय-४३ वर्षे. धंदा- मजुरी रा. मोहोळ ता. मोहोळ } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी सानिया महेबूब मनियार जन्म दि.३१/१०/२०१० रोजी मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची मुलगी सानिया महेबूब मनियार यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.३१/१०/२०१० रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑक्टोबर २०१० चे आभिलेखात अर्जदार यांच्या मुलीची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

युनूस रमजान मुजावर वय-५२ वर्षे. धंदा-मजुरी रा. हल्ली कोलगाव सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची युनूस रमजान मुजावर जन्म दि. ८/४/१९७३ रोजी मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांची युनूस रमजान मुजावर यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता.८/४/१९७३ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९७३ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता.५/१/२०२६

**हुकुमावरून**

## जाहीर प्रसिद्धीकरण अर्ज नं/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

मुसा हैदर शेख वय-७९ वर्षे.धंदा-मजुरी रा.मोहोळ ता.मोहोळ } **अर्जदार**

**विरुध्द**

मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुसा हैदर शेख जन्म दि. १ / ६ / १९४६ रोजी मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचे व मुले म्हणजेच मुसा हैदर शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची ता. १/६/१९४६ रोजी प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९४६ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.२०/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. ५/१/२०२६

**हुकुमावरून**

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील नऊ अतिक्रमणे हटवली

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- टेंभुर्णी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील व लगतच्या अतिक्रमणांबाबत वारंवार सूचना व नोटिसा देऊनही अतिक्रमणधारकांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने, ग्रामपंचायत ठरावानुसार पोलीस बंदोबस्तात एकूण नऊ अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात आली, अशी माहिती सरपंच सुरजा बोबडे यांनी दिली.

सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही कारवाई करण्यात आली. कारवाईनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सरपंच सुरजा बोबडे बोलत होत्या. दिवसभरात काढण्यात आलेल्या अतिक्रमणांपैकी आठ अतिक्रमणधारकांनी पोलीस बंदोबस्त, जेसीबी मशीन व कर्मचारी दल पाहून स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली, तर ग्रामपंचायत आवारातील एका महिलेचे राहते पत्र्याच्या शेडचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले.

या कारवाईवेळी भाजप तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, सरपंच सुरजा बोबडे, उपसरपंच राजश्री नेवसे, ग्रामपंचायत अधिकारी संजय साळुंखे, विस्तार अधिकारी औदुंबर शिंदे, विस्तार अधिकारी डी. एन. मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य गौतम कांबळे, बाळासाहेब ढगे, जयवंत पोळ यांच्यासह ग्रामपंचायतीचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



ग्रामपंचायतीने सन २०२४ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोरील व लगत अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांना वेळोवेळी नोटिसा बजावल्या होत्या. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये अतिक्रमण हटविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. मात्र, माणुसकीच्या नात्याने ग्रामपंचायतीने काही काळासाठी कारवाईला तात्पुरती स्थगिती दिली होती, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

याबाबत बोलताना सरपंच सुरजा बोबडे म्हणाल्या की, 'अतिक्रमण काढण्यात आलेल्या नागरिकांसाठी भविष्यात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पयार्यी जागा उपलब्ध करून देण्याचा विचार केला जाईल. तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आतापर्यंत ९२० घरकुले मंजूर करण्यात आली असून, जास्तीत जास्त गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळावा यासाठी ग्रामपंचायत सातत्याने प्रयत्नशील राहील.ह्व


## CHANGE IN NAME

I am changing my name from ALEJA AMEER BAGWANL to ALEJA AMEER BAGWAN for passport issuance.

## CHANGE IN NAME

I am changing my name from AMEER MEHOOB BAGWAN to AMEER MAHIBOOB BAGWAN for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 145

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# पत्रकार दिनानिमित्त रोहित धोत्रे यूथ फाउंडेशन व आर.डी. ग्रुपच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** रोहित धोत्रे यूथ फाउंडेशन टेंभुर्णी व आर.डी. ग्रुप टेंभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघ व टेंभुर्णी प्रेस क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे औचित्य साधून पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. सहा जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून सर्व पत्रकारांना मिठाई, पुष्पहार, पेन व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन करताना अखिल महाराष्ट्र वडार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी मराठी पत्रकारितेचे



जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांचा उल्लेख केला. ते म्हणाले, 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सत्य, निर्भीडता आणि समाजप्रबोधन हे पत्रकारितेचे मूलतत्त्व असल्याचे अधोरेखित केले. आजच्या काळातही पत्रकारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य प्रामाणिकपणे करावे,' असे प्रतिपादन त्यांनी केले. टेंभुर्णी प्रेस क्लबचे नूतन अध्यक्ष सतिश चांदगुडे तसेच टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघाचे नूतन अध्यक्ष धनंजय भोसले यांनी सत्काराबद्दल मनोगत व्यक्त करत आर.डी. ग्रुप व रोहित धोत्रे यूथ फाउंडेशनचे आभार मानले. या कार्यक्रमास टेंभुर्णीतील पत्रकार संतोष वाघमारे, प्रेस क्लबचे ज्येष्ठ सदस्य सोपान ढगे, सुहास साळुंखे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अनिल जगताप, पत्रकार संघाचे सचिव गणेश पोळ, माजी अध्यक्ष प्रा. हरिश्चंद्र गाडेकर, प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष गणेश चौगुले, सुरज देशमुख, धनंजय मोरे, महावीर वजाळे आदी उपस्थित होते.

सदर पत्रकारांचा सत्कार रोहित धोत्रे यूथ फाउंडेशन व आर.डी. ग्रुपचे अध्यक्ष सूरज भैया धोत्रे, उपाध्यक्ष राहुल धोत्रे, तसेच योगेश वाघमारे, पृथ्वीराज जगताप, ओम आरडे, शुभम पवार, सचिन आखाडे, रोहन जगताप, ओंकार जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

# प्रचाराच्या रिक्षांसाठी परवानगीला विलंब, पालिकेत रांगा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारासाठी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीत एक खिडकी कक्ष सुरू करण्यात आला आहे. सोमवारी या कक्षात प्रचारासाठी रिक्षा व इतर परवानग्यांसाठी मोठी गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

परवानगी प्रक्रियेस विलंब होत असल्याने कर्मचारी संख्या वाढविण्याची मागणी उमेदवार व कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

निवडणूक प्रचारासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या सुलभ, पारदर्शक व वेळेत मिळाव्यात, या उद्देशाने महापालिकेने एक खिडकी



कक्ष कार्यान्वित केला आहे. या कक्षामार्फत प्रचार वाहन परवानगी, खासगी जागेवरील बॅनर व फलक लावण्याची परवानगी, तात्पुरते प्रचार कार्यालय उभारण्याची परवानगी आदी सुविधा एका ठिकाणी देण्यात येत आहेत. या प्रक्रियेत महापालिका, पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन विभाग संयुक्तपणे कार्यरत आहेत.

दरम्यान, सोमवारी विविध परवानग्यांसाठी अर्जदारांची मोठी गर्दी झाली. खिडक्यांची संख्या अपुरी असल्याने रांगा वाढल्या.

अर्ज स्वीकारले जात असले तरी पोचपावती दिली जात नसल्याची तक्रार आहे. प्रचार रिक्षा परवानगीसाठी अनेक कागदपत्रांची मागणी केली जात असून, परवाने मिळण्यास विलंब होत असल्याने रिक्षा चालकांना दीर्घकाळ थांबावे लागत आहे.

या ठिकाणी टोकन सिस्टीम सुरू करावी, बसण्याची व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच कर्मचारी संख्या वाढवावी, अशी मागणी उमेदवार व कार्यकर्त्यांकडून होत आहे. प्रचारासाठी उपलब्ध दिवस कमी असल्याने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तातडीने लक्ष घालून आवश्यक सूचना द्याव्यात, अशीही मागणी करण्यात येत आहे.

# सिद्धी वस्त्रे यांनी स्वीकारला मोहोळच्या नगराध्यक्षपदाचा पदभार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नगरपरिषदेच्या नूतन नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे यांनी गवत्या मारुती चौक येथून नगरपरिषदेपर्यंत भव्य पदयात्रा काढत वाजत-गाजत नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी नगराध्यक्षांसह उपस्थित मान्यवरांनी हातात झाडू घेऊन 'स्वच्छ मोहोळ, सुंदर मोहोळ' चा नारा देत शहरातील मुख्य रस्त्यावर स्वच्छता मोहीम राबवली.

सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या मोहोळ नगरपरिषद निवडणुकीत भाजप व शिवसेना यांच्यात झालेल्या चुरशीच्या लढतीत केवळ २२ वर्षीय सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या शितल क्षीरसागर यांचा पराभव करत



नगराध्यक्षपदावर विजय मिळवला होता.

सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी बोलताना नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे म्हणाल्या, ‘जनतेने मला सेवा करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. या संधीचे सोनं करण्याचा माझा प्रयत्न राहील. विरोधक हे निवडणुकीपुरते होते, आता शहराच्या विकासावर पूर्ण लक्ष दिले जाईल.'

याप्रसंगी प्रभारी मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांनी नूतन नगराध्यक्षांचा सत्कार केला. कार्यक्रमास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, पद्माकर देशमुख, माजी नगराध्यक्ष रमेश बरसकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणाज चवरे, अतुल क्षीरसागर यांच्यासह नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'पांडव सेने' च्या एकजुटीने भाजपचा पराभव अटळ :- आडम मास्तर

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** देशात सध्या जाती-धर्माच्या नावावर राजकारण सुरू असून त्यामुळे लोकशाहीची घडी विस्कटली आहे. देशात अघोषित आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाली असून, अशा वेळी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजप वगळता सर्व पक्ष एकत्र येणे ही स्वागतार्ह बाब आहे. जनतेने भाजपच्या विभाजनकारी राजकारणाला झिडकारून विकासाभिमुख महाविकास आघाडीला विजयी करावे, असे आवाहन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

सोमवारी गांधीनगर येथील हेरिटेज लॉनवर महापालिका निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरून शिंदे



बोलत होते. कार्यक्रमास खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर व प्रकाश यलगुलवार, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष महेश गादेकर, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, मनसेचे प्रशांत इंगळे आदी उपस्थित होते.

उजनी-सोलापूर जलवाहिनी योजनेचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, सुरुवातीला या योजनेवर टीका झाली होती, मात्र आज ती सोलापूरकरांसाठी वरदान ठरत आहे.

निवडणुकीनंतर महापालिकेवर महाविकास आघाडीची सत्ता आली, तर सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. विजय जवळ असून सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असेही ते म्हणाले.

माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी भाजपवर गंभीर आरोप करताना सांगितले की, महापालिका निवडणुकीत उमेदवारांना कोट्यवधी रुपयांची आमिषे दाखवली जात असून पोलीस यंत्रणेचा गैरवापर केला जात आहे.

भाजपविरोधात आवाज उठवत राहणार असून, आमचा महापौर बसू द्या, वर्षभरात दररोज पाणी देऊन दाखवू तसेच सहा महिन्यांत १०० बस आणून शहराची परिवहन व्यवस्था सुधारू, असे आश्वासन त्यांनी दिले.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले की, भाजपने सत्ता टिकवण्यासाठी सर्व प्रयोग केले, मात्र सोलापुरात महाविकास आघाडीचा विजय अटळ आहे. भाजपच्या चुका आता जनतेला स्पष्टपणे दिसत आहेत.

यावेळी शिवसेना, राष्ट्रवादी व मनसेच्या पदाधिकाऱ्यांनीही भाजपच्या धोरणांवर जोरदार टीका केली. प्रास्ताविक प्रा. अशोक निंबर्गी यांनी केले, तर सूत्रसंचालन भारत मुठे यांनी केले. महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांचा परिचय केशव इंगळे यांनी करून दिला.

**ही केवळ आघाडी नव्हे, 'पांडव सेना'**

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने एकत्र आलेले पक्ष म्हणजे केवळ महाविकास आघाडी नसून अन्यायाविरुद्ध लढणारी 'पांडव सेना' आहे. भाजपरूपी कौरवांना हद्दपार केल्याशिवाय ही पांडव सेना गप्प बसणार नाही, असा इशारा माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी दिला.

# कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागृती निर्माण करणे, महिला व बालहक्कांबाबत जनजागृती करणे तसेच सायबर गुन्हयांपासून संरक्षणाबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायाधीश प्रशांत पेठकर यांनी मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांचे कार्य ही वैचारिक क्रांती असल्याचे सांगितले. शिक्षित व सुज्ञ महिलांमुळे समाजात नैतिकतेचे संस्कार रुजतात आणि सामाजिक समतेचे वातावरण निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले. हक्क व अधिकारांचा वापर करताना कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून युवकांनी सतर्क राहून आपल्या करिअरकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात ॲड. अनुराधा कदम यांनी मनोधैर्य योजनेबाबत मार्गदर्शन केले. पीडितांना शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत, संरक्षण व कायदेशीर आधार याविषयी त्यांनी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात सहायक लोकअभिरक्षक सिद्धाराम म्हेत्रे यांनी चाइल्ड फ्रेंडली लीगल सर्व्हिसेस स्कीम २०२४ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सायबर क्राईम जागृती सत्रात श्रीमती अंजली काळे यांनी सोशल मीडियाच्या आमिषाला बळी पडून होणाऱ्या फसवणुकीबाबत सावध राहण्याचे आवाहन केले. सतर्कता आणि जागरुकताच सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा योग्य व सकारात्मक वापर करावा असे सांगितले. महापुरुषांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, सामाजिक बंधुभाव जपावा आणि न्यायव्यवस्था टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजिका डॉ. संगीता भोसले यांनी केले. आभार डॉ. अशोक पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन कु. रेश्मा सुर्वे यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर चे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवेच्या कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सैन्यदलात अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे सी.डी.एस. (Combined Defence Services) कोर्स क्र. 66 आयोजित करण्यात आला आहे. हा कोर्स दिनांक 19 जानेवारी 2026 ते 3 एप्रिल 2026 या कालावधीत पार पडणार असून प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मुलाखत**

सोलापूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे 13 जानेवारी 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे.

मुलाखतीस येताना उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवरून CDS-66 कोर्ससाठी प्रवेशपत्र व परिशिष्टांची प्रिंट काढून पूर्ण भरून सोबत आणणे बंधनकारक आहे.

**पात्रता निकष**

सी.डी.एस. प्रशिक्षण वर्गामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी खालील पात्रता आवश्यक आहे:

- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
- उमेदवाराने संघ लोकसेवा आयोग (UPSC), नवी दिल्ली मार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी संपर्क साधावा.

- ईमेलः training.pctcnashik@gmail.com
- दूरध्वनीः 0253-2451032
- व्हाट्सॲपः 9156073306

कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित सी.डी.एस. कोर्स क्र. 66 ही अधिकारी पदासाठी इच्छुक नवयुवक-नवयुवतींसाठी मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी असून सोलापूर जिल्ह्यातील उमेदवारांनी 13 जानेवारी रोजी मुलाखतीस हजर राहावे.

# मुख्यमंत्र्यांना हटवण्याच्या हालचालींनी भाजपमध्ये खळबळ : पटोले

**नागपूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पदावरून हटवण्यासाठी भाजपमधीलच एक गट सक्रिय झाला असून, या हालचालींची पूर्ण माहिती मुख्यमंत्र्यांनाही आहे, असा खळबळजनक दावा काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना केला.

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपचे ज्येष्ठ नेते व महसूलमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना सुरुवातीला मंत्रिपद न मिळाल्याने नाराजी व्यक्त झाली होती.

याच पार्श्वभूमीवर पटोले म्हणाले की, 'मुनगंटीवारांचे जे काही सुरू आहे, त्याची संपूर्ण कल्पना फडणवीसांना आहे. भाजपमध्ये ठिकठिकाणी मुख्यमंत्र्यांविरोधात मोहीम राबवली जात असून, त्यांना पदावरून हटवण्यासाठी एक गट सक्रिय आहे. येत्या काळात भाजपमध्ये सत्तासंघर्षाचा मोठा स्फोट पाहायला मिळेल.'

शेतकऱ्यांच्या कर्जावरील स्टॅम्प ड्यूटी माफीच्या निर्णयावर टीका करताना पटोले म्हणाले की, ही निवडणुकीच्या तोंडावर केलेली घोषणा आहे. भाजप सत्तेच्या माजात वागत असून जनतेमध्ये प्रचंड रोष आहे. येणाऱ्या काळात या रोषाचा उद्रेक होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# भाजपाच्या जाहीरनाम्याचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराला दररोज पाणी पुरवठ्यासाठी ८९२ कोटींची योजना पूर्ण करण्याला अन आयटी पार्क सुरू करण्याला भाजपाच्या जाहीरनाम्यात प्राधान्य देण्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी जामगोंडी मंगल कार्यालयात झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजपाच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपा पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, शिवराज सरतापे, सुधा अळीमोरे, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे उपस्थित



**प्रदेशाध्यक्षांकडून कौतुक आणि इशारा**

भाजपाच्या कार्यकर्ता मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उमेदवारी न मिळूनही प्रचारात झोकून दिलेल्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले. परंतु पक्ष विरोधात काम करणाऱ्यांवर भाजपाकडून कारवाई करणार असल्याचा इशाराही प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी दिला.

होते.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, भारतीय जनता पार्टीने सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या जाहीरनाम्यातील प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्याकरिता भाजपा कटिबद्ध आहे. सोलापुरात आयटी पार्कचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजपाकडून मागणी करण्यात येईल.

या जाहीरनाम्याच्या माध्यमातून भाजपने सोलापूरकरांना विकासाची साद घातली आहे. विकसित भारतासाठी विकसित सोलापूर हे ब्रीदवाक्य घेऊन भाजपा यंदा महापालिका निवडणुकीत जनतेसमोर जात आहे.

सोलापूर शहराचा संपूर्ण विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटीबद्ध असून जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासने भाजपा पुन्हा सत्तेवर आल्यानंतर निश्चितपणे पूर्ण करेल, असे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

# राजेंद्र गुंड यांचा पत्रकार दिनानिमित्त मानेगाव येथे सत्कार

**माढा (कटूसत्य वृत्त):-** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. प्रभावी,परखड,वस्तुनिष्ठ, वास्तव व निर्भीड लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनेक मूलभूत व महत्त्वाचे प्रश्न सुटू शकतात.विशेषतः सर्वसामान्य जनता व कष्टकरी शेतकऱ्यांना अनेक वेळा कोणीही वाली नसतो त्यांना शासन व प्रशासन वाऱ्यावर सोडून देते तेंव्हा प्रत्येक पत्रकाराने सर्वसामान्य व गोरगरीब जनता,शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच रस्ते,वीज,पाणी आदी समस्या प्रभावीपणे मांडून शासन व अधिका-यांच्या निदर्शनास आणून दिले तर काही प्रश्न व समस्या सहज सुटू शकतात असे प्रतिपादन माजी सरपंच शिवाजी भोगे यांनी केले आहे.

ते मानेगाव ता.माढा येथे 6 जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकार राजेंद्र गुंड सर यांचा सत्कार करताना बोलत होते.

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पत्रकार



दिनानिमित्त आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड सर यांचा सत्कार माजी सरपंच शिवाजी भोगे व माजी प्रभारी मुख्याध्यापक प्रविण लटके यांच्या हस्ते करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना पत्रकार राजेंद्र गुंड यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धेच्या युगात पत्रकारिता करणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. पत्रकारिता हे एक सामाजिक व्रत व छंद आहे.पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य व गोरगरीब जनता,कष्टकरी शेतकरी यांचे प्रश्न व समस्या वेळोवेळी मांडण्याचा मनापासून प्रयत्न केला आहे यापुढेही समाजातील सर्व स्तरांतील लोकांना पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे.

आजतागायत केलेल्या पत्रकारितेमुळे अनेक चांगले लोक व अधिकारी जोडले आहेत याचा मनस्वी आनंद होत आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी सरपंच तानाजी लांडगे, माजी उपसभापती उल्हास राऊत,मनोहर मोटे,कोरफळचे लहू गवळी,मालवंडीचे सागर राजगुरू यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सोलापूर शहराला दररोज पाणी दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही- आ. देवेंद्र कोठे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराला पाण्याचा दिवस म्हणजे एक प्रकारचा शाप आहे. ही स्थिती बदलण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 892 कोटींची योजना मंजूर केली आहे. ही योजना पूर्ण करून शहराला दररोज पाणी दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे अभिवचन शहर मध्यचे लोकप्रिय आमदार देवेंद्रदादा कोठे यांनी सोमवारी दिले.सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक 13 मध्ये भाजप उमेदवारांच्या संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजप शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, यंत्रमाग उद्योजक भूपती कमटम, पेंटप्पा गड्डम, अंबादास बोल्ली, माजी उपमहापौर प्रविण डोंगरे,राजमहेंद्र कमटम,अशोक काळजे, व्यंकटेश बिटला, भाजपचे उमेदवार सुनिता कामाठी, अंबिका चौगुले, विजय चिप्पा, सत्यनारायण गुर्रम, निवडणूक प्रमुख विजयाताई



वड्डेपल्ली यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आमदार देवेंद्रदादा कोठे पुढे म्हणाले की, प्रभाग क्रमांक 13 हा भाजपचा बालेकिल्ला तसेच शहर मध्यचा केंद्रबिंदू आहे. यंदाच्या महापालिका निवडणुकीसाठी या प्रभागात इच्छुकांची संख्या मोठी होती. त्यामुळे माझ्यासह शहराध्यक्ष तसेच प्रदेशापुढे मोठा पेच पडला होता. 40 इच्छुकांपैकी केवळ चार जणांना पक्षाने संधी दिली. मात्र याचा अर्थ 36 परके आहेत, असा होत नाही. पक्ष संधी दिली नाही तरी या प्रभागातील जुने तसेच सर्व सहकारी तळमळीने काम करीत आहेत. त्यांना मी एकच सांगू इच्छितो भाजप ही कार्यकर्त्यांची, त्यागाची व न्यायाची पार्टी आहे. उमेदवारी दिली नसतानाही कार्यकर्ते घरात बसले नाहीत, पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानून ते या निवडणुकीत परिश्रम घेत आहेत, याचा मला अभिमान आहे. काळाचा महिमा एवढा अगाध आहे की, सन 2017 मध्ये ज्यांना पक्षाने उमेदवारी नाकारली अशा रोहिणी तडवळकर आज शहराध्यक्षपदी काम करीत कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आहेत. हे लक्षात घेता कार्यकर्त्यांनी जबाबदारीने काम करावे. त्यांच्या कार्याची दखल निश्चितपणे होऊन त्यांना न्याय देऊ, असे आश्वासन आमदार देवेंद्र कोठे यांनी दिले. सोलापूर शहरात पाणी हा कळीचा मुद्दा आहे. तीन ते पाच दिवसाआड सोलापूरला पाणीपुरवठा केला जातो. पाण्याचा दिवस हा शाप आहे. हे चित्र बदलण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी 892 कोटींची योजना मंजूर केली आहे. ही योजना कार्यान्वित झाल्यावर शहराला दररोज व समान पाणीपुरवठा करणार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कार्यपद्धतीवर तसेच भाजपवर विश्वास ठेवून मी काम करीत आहे. येथील शिकलेली तरुण पिढी रोजगारअभावी बाहेरगावी जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी सोलापूरसाठी आयटी पार्क मंजूर केले आहे. आयटी पार्कसाठी विमानसेवा आवश्यक होती. त्याचीही पूर्तता झाली आहे. गोवा, मुंबईनंतर आता बंगलोर, तिरुपतीला विमानसेवा सुरू होणार आहे. खासदार प्रणिती शिंदे या वारंवार विमानसेवा बाबत आव्हान देत होत्या. पण कामाची गॅरंटी म्हणजे देवेंद्र फडणवीस आहेत, हे सिद्ध झाले. आयटी पार्क झाल्यावर सोलापुरातील तरुणाईला सोलापुरातच रोजगार मिळून आई-वडिलांसमवेत राहण्याचे पुण्य मिळणार आहे.

या विविध गोष्टी होण्यासाठी महापालिकेत भाजपची सत्ता येणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी या निवडणुकीसाठी झटून भाजपच्या चारही उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन शेवटी आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. कार्यक्रमास अनिल कामाठी, मनोहर विडप, दिलीप शिंदे, अंबादास बोल्ली, पांडुरंग मुदगल, लक्ष्मण विटकर, सुरेश तमशेट्टी, मधुकर वडनाल,भीमाशंकर बोळकोटे, दत्तात्रय कल्पवृक्ष, मच्छिंद्र जाधव, मारुती विटकर,जगू काळे,विकास पवार,महादेव घोडक,वंदना भिसे, मल्लिकार्जुन सरगम, सदानंद गुंडेटी, यादगिरी बोम्मा, गंगाधर गुल्लापल्ली, व्यंकटेश क्यातम, शंकर चौगुले,अमर चिप्पा, अनिल चिप्पा,प्रशांत पासकंटी, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, महेश अलकुंटे, आदी उपस्थित होते.